नि. फौ. ख. क्र.६८/२०२१.
सरकार वि. गणेश
निशाणी क्रं. **२२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०२ चा पुरावा शपथेवर सुरू**
नावः सर्जेराव वामनराव ठेंगडे.
वयः ७२ वर्षे धंदाः शेती,
पत्ताः रा.पळसवाडी, ता. खुलताबाद, जि.औरंगाबाद.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरकारी वकिल श्री. एस.ए.बनसोडे यांच्यामार्फत साक्षीदाराचा सरतपास सुरु.</u>**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. मी घटनेच्या वेळेस पळसवाडी येथील माझ्या शेतात गट नं. १७५ मधे होतो. त्यावेळेस मी घरात बसलो होतो. त्यावेळेस घरातील सर्व व्यक्ती हजर होते. सकाळी आठ ते नउ वाजता सर्व आरोपी आमच्या बांधावर झाड तोडत होते. आरोपी फिर्यादीला मारहाण करीत होते. त्यानंतर मी भांडण सोडवायला गेलो असता आरोपी क्र.१ ने मला काठीने डोक्यात मारले. आमच्या दोघांना मार लागला. फिर्यादीच्या डोक्यात कु-हाड मारली. फिर्यादीला हाताला व छातील मार लागला. त्यानंतर आम्ही पो.स्टे.ला गेलो. पोलीसांनी दवाखान्यात पाठवले. खुलताबाद सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांनी आम्हाला औरंगाबाद येथील घाटी दवाखान्यात पाठवले. तेथे आम्ही उपचार घेतला. मी कु-हाड पाहिल्यास ओळखू शकत नाही.
**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.पी.काळे यांच्या मार्फत उलटतपास सुरु.</u>**

**०२.** मला घटनेचा तारीख व वार आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या बक-या किती होत्या हे मी सांगू शकत नाही. बक-या कोणाच्या मालकीच्या होत्या हे मी सांगू शकत नाही. घटनेच्या दिवशी पोलीसांनी संध्याकाळी चार-पाच वाजता विचारपूस केली. त्यावेळेस बाहेरील व्यक्ती पोलीसांसोबत होते किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. मी हे सांगू शकत नाही की, गट नं. १७५ या जमीनीचा वाद होता किंवा नाही. मी गट नं. १७५ ची सरकारी मोजणी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मोजणीमध्ये गट नं. १७५ चे क्षेत्र कमी भरले. हे म्हणणे खरे आहे की, शेतीलगत शेतक-यांकडे उर्वरीत क्षेत्र निघते. हे म्हणणे खरे आहे की, शेजारी आरोपी यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, उर्वरीत अतिक्रमित क्षेत्र हे मिळावे ही इच्छा आहे. त्या व्यकतींनी इच्छेने दिल्यास मी घेऊ शेतो. हे म्हणणे खरे आहे की, उर्वरीत क्षेत्र मिळण्याकरीता आमच्यात बोलणी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या लोकांनी जमीन देण्यास नकार दिला.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, अतिक्रमित क्षेत्र मिळण्याकरीता खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १७४ व १७५ मधे तारकंपाउंड आहे. आमच्या जमीनीच्या पूर्वेला

आरोपींची जमीन आहे. माझ्या जमीनीच्या पूर्व बाजुला रस्ता आहे. रस्त्याच्या पश्चीमेला तारकंपाउंड आहे. तारकंपाउंड हे माझ्या क्षेत्रात आहे. रस्त्यानंतर आरोपींची जमीन आहे. आरोपींच्या जमीनीमध्ये झाडे नाहीत. आमच्या जमीनीत झाड आहेत. ७/१२ मधे झाडांची नोंद आहे. पोलीसांना तो ७/१२ दिला नाही. हे मी सांगू शकत नाही की, पोलीसांनी जायमोक्यावरुन झाडांचे फांद्या, खोड किंवा फोटो काढून नेले किंवा नाही. फिर्यादी हा एक दिवस ॲडमिट होता.

**०४.** मी पोलीसांना जबाब दिला किंवा नाही हे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची कमी पडलेली जमीन परत देण्याकरीत खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींकडे बक-या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला व फिर्यादीला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस शेतात काही पिक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**
दिनांक - १७ /०२/२०२६.

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.02.17 17:57:01 +0530

**(जी. डी. गुरनुले)**
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खुलताबाद.